

# ठाकरे, पवारांच्या प्रतिष्ठेचा 'हायव्होल्टेज' निवडणूक हंगामा

सचिन अपसिंगकर
बार्शी

**धाराशिव लोकसभा मतदारसंघ शिवसेना एकनाथ शिंदे गटाचा दावा असतानाही तो सर्वस्व पणाला लावून राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाकडे खेचून आणत तुळजापूरचे भाजप आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या पत्नी अर्चना पाटील यांना उमेदवारी मिळाली. या मतदारसंघात पाच वर्षे बारमाही संपर्कात राहिलेल्या विद्यमान खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या लवकर घोषित झालेल्या उमेदवारीमुळे ही लढत लक्षवेधी बनली आहे. त्याचप्रमाणे अर्चना पाटील यांचा उमेदवारी अर्ज भरताना राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीमुळे तर ओमराजेंचा उमेदवारी अर्ज भरताना माजीमंत्री आदित्य ठाकरे यांच्या उपस्थितीत झालेल्या शक्ती प्रदर्शनामुळे ही लढत ठाकरे, पवार यांच्याही प्रतिष्ठेची बनली आहे. धारशीव मतदार संघात ठाकरे, पवारांच्या प्रतिष्ठेचा हायव्होल्टेज निवडणूक हंगामा असेच येथील लोकसभा निवडणुकीचे वर्णन केले जात आहे.**



राष्ट्रवादी आणि शिवसेनेत पडलेल्या फुटीनंतर तसेच भाजप शिवसेना युती फुटल्यानंतर झालेल्या राजकीय परिवर्तनाचीही मोठे पडसाद या निवडणुकीवर उमटले असून गत लोकसभा निवडणुकीत ज्या उमेदवारांच्या बाजूने प्रचार केला त्या उमेदवारांच्या विरोधात प्रचार करण्याची वेळ या मतदारसंघातील बहुतांश राजकीय नेत्यावर आली आहे. त्यामुळे अनेक अर्थाने ही लढत रंगतदार आणि चुरशीची ठरते आहे. या निवडणूकीत शिवसेना व राष्ट्रवादी या पक्षांच्या प्रमुख राजकीय नेत्यांच्या सभा मतदारसंघात होणार हे निश्चित असून प्रचार सुरु होत असताना होणाऱ्या आरोप-प्रत्यारोपांकडे सर्वाचे लक्ष लागले आहे.

अजित पवार यांच्या निकटवर्तीय नातेवाईक असलेल्या अर्चना पाटील या धाराशिव जिल्ह्याच्या राजकारणात गेली साडेचार दशके सक्रिय असणाऱ्या माजी कॅबिनेट मंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांच्या सुनबाई आहेत. तर त्यांच्या विरोधातील महाविकास आघाडीचे उमेदवार ओमराजे निंबाळकर हे तसे नात्याने पाटील यांचे दीर आहेत. त्यामुळे टोकाचा दुरावा निर्माण झालेल्या जवळच्या नात्यामधील हा सामना अनेकार्थांनी धाराशिव जिल्ह्याच्या राजकारणात उलथापालथ घडविणार आहे.

या लढतीची वैशिष्टे म्हणजे या दोन्ही उमेदवारांना शिवसेना आणि राष्ट्रवादी या दोन पक्षांमध्ये पडलेल्या फुटीनंतर झालेल्या परिवर्तनाला सामोरे जावे लागणार आहे. शिवसेना प्रमुख ठाकरे यांच्यावर निष्ठा ठेवणाऱ्या ओमराजे निंबाळकर यांना एकनाथ शिंदे यांनी केलेल्या बंडानंतर धनुष्यबाण या चिन्हाला पारखे होत ही निवडणूक लढवावी लागणार आहे. तर राष्ट्रीय नेते शरद पवार यांच्या राजकीय वाटचालीत समकालीन सहकारी अशी प्रतिमा असणाऱ्या आणि सातत्याने डॉ. पाटील व त्यांचे पुत्र राणाजगतसिंह पाटील यांच्या प्रत्येक निवडणुकीत प्रचार सभेला येणारे शरद पवार यांच्या यावेळी अनुपस्थितीला पाटील घराण्याला तोंड द्यावे लागणार आहे. पवार काका - पुतण्यामधील बेबनावानंतर निर्माण झालेल्या राजकीय पेचप्रसंगाचे मोठे पडसाद धाराशीव जिल्ह्यावर आणि पर्यायाने पाटील पिता-पुत्राच्या राजकारणावरही उमटले आहे.

सध्या अजित पवार यांनी पाटील पिता पुत्रांची खंबीरपणे पाठराखण केली असली तरी राणाजगतसिंह पाटील हे भाजपचे आमदार आणि त्यांच्या पत्नीला मात्र राष्ट्रवादीमधून उमेदवारी या राजकीय विसंगतीलाही त्यांना प्रचारा दरम्यान तोंड द्यावे लागत असून विरोधी उमेदवार नेमके या विसंगतीवर बोट ठेवत आहेत. धाराशीव जिल्ह्यात भाजपचे तीन आमदार उध्दव ठाकरे यांच्या शिवसेनेचा एक आमदार व एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे दोन आमदार आहेत. मात्र या लोकसभा मतदारसंघाच्या कार्यक्षेत्रात राष्ट्रवादीचा एकही आमदार निवडून आलेला नसतानाही या मतदार संघात राष्ट्रवादीला लोकसभेची उमेदवारी मिळाली हे विशेष आहे.

## नवीन चिन्हे पोचविण्याचा आव्हान

धाराशीव लोकसभा मतदारसंघात महायुतीचे पाच आमदार असून त्यापैकी एक आमदार म्हणजे डॉ. तानाजीराव सावंत हे राज्याचे कॅबिनेट मंत्री असून जिल्ह्याचे पालकमंत्रीदेखील आहेत. त्यामुळे या मतदारसंघात अर्थातच महायुतीचीदेखील मोठी कसोटी आहे. गत लोकसभा निवडणुकीत आणि आजपर्यतच्या लोकसभा निवडणुकांमध्ये सातत्याने मतदान पत्रिकेवर असणारा धनुष्यबाण या निवडणुकीत गायब झाला आहे. त्यामुळे हे चिन्ह गमावलेल्या ओमराजे निंबाळकर यांना आपले नवीन चिन्ह मतदारापर्यंत पोचवताना मोठी मेहनत घ्यावी लागणार आहे.

# लोकसभेच्या निकालात अहो, दडलंय तरी काय?







**सोलापूर : सोलापूर आणि माढा लोकसभा निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहचला आहे. महयुतीचे पदाधिकारी आमदार राम सातपुते आणि खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना तर तर महाआघाडीचे पदाधिकारी आ. प्रणिती शिंदे आणि धैर्यशिल मोहिते-पाटील यांना विजयी करण्यासाठी जीवाचे रान करताना दिसत आहेत. त्याला कारणही तसेच आहे. कारण याच लोकसभा निवडणुकीच्या निकालावर आगामी विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थेचे गणित अलवंबून असणार आहे. या निवडणुकीत जो बाजी मारेल त्याला आगामी निवडणुकीत ॲडव्हान्टेज मिळणार हे नक्की.**

गेल्या पाच वर्षात राज्याच्या राजकारणात कोणालाही वाटल्या नसतील तेवढ्या घडमोडी झाल्या आहेत. सत्तेत शिवसेना आणि राष्ट्रवादी आहे तर दुसरीकडे विरोधातही शिवसेना आणि राष्ट्रवादी आहे. देशात ४०० पारचा तर महाराष्ट्रात ४५ पारचा नारा भाजपाने दिला आहे. महाराष्ट्रात महायुतीला ४५ पार करताना अडचणी येताना दिसत आहेत. त्यामुळे आगामी काळातही राज्याच्या राजकारणात आणखी मोठे बदल होतील, असेही बोलले जात आहे. त्यासाठी ही लोकसभा निवडणूक महत्वाची आहे. यानिवडणुकीनंतर लगेच विधानसभा, जिल्हा परिषद, महापालिका आणि त्यानंतर विधान परिषदेची निवडणूक होणार आहे. गेल्या दोन वर्षांपासून या निवडणुका रखडल्या आहेत. अनेकजण यासाठी गुडघ्याला बाशिंग बांधून बसले आहेत. त्यासाठी सोलापूर आणि माढा लोकसभेचा निकाल महत्वाचा मानला जात आहे. दुसरीकडे निश्चितपणे काहीजण आपल्याला आमदारकीची संधी मिळणार म्हणून तर काहीजण महापालिका, जि. प. मध्ये संधी मिळेल या आशेने उमेदवारांचे जोरदार प्रचार करीत आहेत. उमेदवारही त्यांना काहीतरी शब्द देऊन आपल्या प्रचारात उतरवताना दिसत आहेत. नेते दिलेला शब्द पाळतील, अशी भोळीभाबडी अपेक्षा ठेवून कार्यकर्तेही कामाला लागले आहेत.

### कोणाचे काम करायचे; कार्यकर्त्यांपुढे प्रश्न

सध्या राज्यात आणि केंद्रात भाजपाचे सरकार असल्याने सर्वांचा ओढा साहजकीच भाजपकडे आहे. मात्र निकालात जर उलटफेर झाला तर हे चित्र उलटे असू शकेत. त्यामुळे सर्वच राजकीय पक्षाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांपुढे कोणाचे काम करायचा आहे प्रश्न पडला आहे.

# यहाँ का इलेक्शन वा वा... यहाँ का नेता वा वा...

विष्णू सुरवसे
उत्तर सोलापूर



**महायुतीचे उमेदवार राम सातपुते आणि आघाडीच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांचा प्रचार उत्तर सोलापूर तालुक्यात जोरकसपणे सुरु आहे. आपल्या उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत निवडून आणून विजयाचा गुलाल उधळण्यासाठी सज्ज होत असलेल्या महायुती आणि महाविकास आघाडीचे नेते, पुढारी, पदाधिकारी, प्रमुख कार्यकर्ते या सगळ्यांनीच निवडणूकीसाठी कंबर कसली आहे. अत्यंत लक्षवेधी आणि निर्णायक होत असलेल्या या निवडणुकीबद्दल आणि सर्वांच्या झोकून देऊन काम करण्याच्या भूमिकेवरुन 'यहाँ का इलेक्शन वा वा... यहाँ का नेता वा वा...असेच त्याचे वर्णन करता येईल.**

मात्र आघाडीत बिघाडीत तिघाडी अशी परिस्थिती सध्या मतदार अन् मतदार संघात झाल्याचे बोलले जात आहे. भाजप व मित्र पक्षाचे उमेदवार राम सातपुते यांच्या प्रचारासाठी वरिष्ठ नेत्यांनी कंबर कसली आहे.

आपल्या उमेदवाराच्या प्रचारासाठी राहुल गांधी, पंतप्रधान नरेंद मोदी हे सोलापूर दौऱ्यावर येणार आहेत. राष्ट्रीय स्तरावरील नेते प्रचार करीत असल्याने नक्कीच वोटिंगमध्ये वाढ होणार. मात्र कोण प्लसमध्ये तर कोण मायनसमध्ये जाणार हे ४ जून रोजीच कळणारच आहे. प्रणिती शिंदेंनी यांना अगोदर पासूनच लोकसभेची उमेदवारी फायनल झाली असे समजून जिल्हास्तरीय मोर्चे बांधणी केली होती. जुन्याच मैदानात ही निवडणूक सोपी वाटत असली तरी देखील दोघांनाही निवडणूक जिंकण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागणार, असे बोलले जाते.

आघाडीमध्ये उध्दव बाळासाहेब ठाकरेंचे कट्टर शिवसैनिक आहेत. त्यांचे आदेश मानून आघाडीच्या उमेदवारासच मतदान करतील यात शंकाच नाही. प्रणिती शिंदेंना मताधिक्य मिळण्यात शिवसेनेचा मोठा वाटा उत्तर सोलापूर तालुक्यातून राहणार आहे.

**- संजय पौळ-उत्तर तालुका प्रमुख- उद्धव ठाकरे गट**

---

उमेश पाटील गट देखील मोहोळ मतदार संघात युतीच्या मित्र पक्षातील उमेदवाराचा प्रचार करीत असून मोहोळ मतदार संघात टक्केवारी मध्ये वाढ होणार आहे.

**- नंदकुमार गरड**

उत्तरमध्ये सध्या भाजप व मित्र पक्षाचे तीन आमदार आहेत. अन् मोदी लाटही आहेच, आमदारांनी गावस्तरीय तालुकास्तरीय विविध विकास कामाच्या जोरावर राम सातपुते यांना भरघोस मते पडतील.

**- राम जाधव, भाजप उत्तर तालुका अध्यक्ष**

---

प्रणिती शिंदे स्थानिक आहेत, त्यांना समस्या ज्ञात आहेत. विधानसभेत अनेक प्रश्न मांडून अनेक समस्या सोडविल्या आहेत. मोदी लाट जरी असली तरी देखील उत्तर मधून ३० हजारांवर लीड मिळेल.

**- भारत जाधव, काँग्रेस उपजिल्हा प्रमुख**

---

आघाडीच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांना राजकीय वारसा असून कामाचा अनुभव आहे, त्यांनी शहर असो किंवा ग्रामीण असो विविध समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न केला आहे. सुशीलकुमार शिंदे यांच्या राजकीय कारकीर्दमध्ये अनेक नेतेमंडळींना ऊर्जा दिली आहे. त्यांचे पाठबळ, विविध सामाजिक संघटना पक्षाचे सहकार्य प्रणिती शिंदें यांना मनापासून मिळत आहे.

**- संजय खरटमल, काँग्रेस उत्तर तालुका सचिव**



# दुधाचे अनुदान मिळणार कधी?

## राज्य सरकारविरोधात मोठा असंतोष; निवडणुकीत पडसाद उमटणार

विकास चाटी
सोलापूर

**सोलापूर : दुध दरातील घटीमुळे संतापललेल्या दुध उत्पादकांना राज्यसरकारने प्रतिलिटर पाच रुपये अनुदानाची घोषणा केली खरी, मात्र योजनेतील अटीशर्तीमुळे जिल्ह्यात ७० टक्के दुध उत्पादकांना याचा लाभच मिळालेला नाहीय. परिणामी त्यांच्यामध्ये संताप असून लोकसभा निवडणुकीत त्याचे पडसाद उमटण्याची शक्यता आहे.**

सात-आठ महिन्याखाली ४० रुपये प्रति लिटर या दराने दूध संघांना दुध घालणाऱ्या शेतकऱ्यांवर तीन-चार महिन्यांपासून फक्त २२-२४ रुपये प्रति लिटर इतक्या कमी दराने दुध घालण्याची वेळ आली आहे. त्याविरोधात दुध-उत्पादक शेतकऱ्यांकडून तीव्र आंदोलन पुकारल्यानंतर राज्य सरकारने प्रतिलिटर पाच रुपये अनुदानाची योजना जाहीर केली. मात्र योजनेतील अटीशर्तीमुळे सोलापूर जिल्ह्यातील जवळपास ६० ते ७० टक्के दुग्धोत्पादक वंचित राहणार आहेत.

दुध दर कोसळल्याने जे शेतकरी दूध संघाला भरपूर दूध घालायचे त्यांच्या उत्पन्नामध्ये निम्म्याने घट आली आहे. सरकारने दुध अनुदान योजना जाहीर केल्यावर त्यांना दिलासा मिळेल असे वाटले होते. मात्र सरकारच्या योजनेत सहकारी दुध संघात दुध घालणाऱ्या, गाईंना ईअर टॅगिंग असणाऱ्या शेतकऱ्यांनाच हे अनुदान मिळेल, असे असल्याने त्यांची निराशा झाली. असंतोष वाढल्यानंतर सरकारने खासगी दुध संघांनाही योजनेत सामील करुन घेतले. अनुदानासाठी दूध संकलनाची माहिती पोर्टलवर भरण्यासाठी राज्य सरकारने १५ एप्रिलपर्यंतची मुदतवाढ दिली. मात्र, टॅगिंग, पशुपालक, जनावरांची माहिती भरण्यास अपुऱ्या कालावधीमुळे अनेक लाभार्थी अनुदानापासून वंचित राहण्याची शक्यता असल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे. अनुदानासाठी ज्या संस्थांना अर्ज करावयाचा आहे. त्यांनी दुध घालणाऱ्या शेतकऱ्याची माहिती, पशुधन टॅगिंग, जनावरांची माहिती भरण्यासाठी २८ मार्चपर्यंत मुदत दिली होती. त्या मुदतीतही अनेक संस्थांनी माहिती न भरल्याने आधी ३१ मार्च व नंतर १५ एप्रिलपर्यंत मुदतवाढ दिली. मात्र पहिल्यांदाच अशाप्रकारचा प्रयोग होत असल्याने तसेच शासकीय निर्णयात वारंवार बदल झाल्याने, तांत्रिक अडचणी व अपुरा वेळ यामुळे पशुधन पोर्टलवर सर्वच पशुपालकांची माहिती भरता आली नाही. तरीही घाईघाईत प्रशासनाने पोर्टल बंद केल्याने अनेक पशुपालक अनुदानापासून वंचित राहणार आहेत. सरकारने दूध संकलनाची माहिती भरण्यास मुदतवाढ दिली. मात्र, पशुपालकांची माहिती भरण्यास मुदतवाढ का दिली नाही, असा सवाल पशुपालकांकडून विचारला जात आहे.

अनुदान योजनेत जिल्ह्यातील २० दूध संस्थांनी सहभाग घेतला आहे. मात्र माहिती १५ संस्थांनीच भरली आहे.

तसेच आणखी मोठी बाब अशी की दुधाच्या ३.५ टक्के फॅट व ८.५ टक्के एसएनएफ या गुणप्रतिकरीता किमान २७ रुपये प्रति लिटर इतका दर दुधसंघांनी संबंधित दुध उत्पादक शेतकऱ्याच्या बँक खात्यावर ऑनलाईन देणं बंधनकारक केले आहे. आता जिल्हयात ही अट पूर्ण करणारे किती दुधसंघ आहेत, हे पाहता प्रत्यक्षात हे दुधाचे अनुदान जिल्ह्यातील बहुतांश दुधउत्पादकांसाठी मृगजळच ठरणार आहे. सरकारची योजना म्हणजे ती मिळवण्यासाठी नुसती धावपळ करायची आणि तरीही त्याचा लाभ मिळेल याची शाश्वती नाही, अशी भावना दुध उत्पादक शेतकऱ्यांमध्ये झाली आहे. परिणामी त्यांच्या मनात सरकारविरोधात संतापाची भावना आहे.



माझी दुध डेअरी आहे. मी दर दहा दिवसांनी दुधसंघाला माझ्यासह सर्व सभासदांचे मिळून ७-८ हजार लिटर ०दुध घालतो. सहा महिन्याखाली पाच लाखांपर्यंत रुपये सर्वांना वाटप करायचो. मात्र आता दुध दर निम्याने घटल्याने आमचे उत्पन्नही निम्मे झाले आहे.

**-आनंद चौगुले, दुध डेअरी चालक, डोणगाव**

---



सहा महिन्याखाली ३८ रुपयांनी दूध घालायचो, आता २२ रुपयांनी घालतोय. या पैशात बँकेचा हफ्ताही फेडता येत नाही. दुध अनुदानाचे पैसे मिळाल्यास बुडत्याला काडीचा आधार मिळेल.

**- विजय सुरवसे, दुग्धोत्पादक शेतकरी, डोणगाव**

---



आम्ही दुध अनुदान योजनेच्या सर्व अटींसह या योजनेत अर्ज केला आहे. मात्र अद्यापही आमच्या खात्यात अनुदान आलेले नाही. आमच्या गावात फक्त ५ ते १० टक्के लोकांनाच याचा लाभ मिळाला आहे. किती दिवस वाट पहायची?

**- सागर भैंस, दुग्धोत्पादक शेतकरी, पिलीव**

---

आम्ही या योजनेत सर्व कागदपत्रे दिली. मात्र आधारकार्ड व बँकखात्यावरील माझ्या नावात स्पेलिंगमध्ये व्ही व डब्लू असा फरक असल्याने आम्हाला दुरुस्त करावयास सांगितले. ते केल्यानंतर अद्यापही अनुदान मिळालेले नाही.

**- विनायक चौबे, दुग्धोत्पादक शेतकरी, पिलीव**